माजी नगरसेवक अभिजित भोसले यांनी डांबरीकरणाचे काम तीन तास रोखले

नको तिथे डांबरीकरणावर उधळपट्टी : उपनगरात सुविधांना कात्री

केसरी वृत्तसेवा

सांगली : शामराव नगरसारख्या भागात नागरी सुविधा नाहीत, अनेक कामांना निधी मागितला तरी मिळत नाही. पण स्टेशन चौकातील रस्ता चांगल्या स्थितीत असताना या रस्त्याचे डांबरीकरण करून पैशाची उधळपट्टी केली जात आहे. आयुक्तांकडून विकासकामात असमतोलपणा असल्याने प्रभाग क्रमांक अठराचे माजी नगरसेवक अभिजीत भोसले यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्यांनी स्टेशन चौकातील डांबरीकरणाचे काम तीन तास बंद पाडले. दोन दिवसात शामरावनगरमधील कामे मार्गी लावण्याचे आश्वासन आयुक्तांनी दूरध्वनीवरून देत भोसले यांची समजूत काढली. त्यानंतर या कामाला सुरूवात करण्यात आली.

प्रभाग क्रमांक अठरामधील विविध विकासकामांसाठी मागील वार्षिक अंदाजपत्रात सभागृह बांधकाम, उद्यान कंपाऊंड यासाठी निधी मंजूर झाला होता. पण कामास सुरूवात झाली नाही. आर्थिक वर्ष संपत आले तरी काम मार्गी लागले नाही. अतिवृष्टीमध्ये कोल्हापुररोड शामरावनगर पासून हनुमाननगर परिसरात स्वतः भेट दिलेली होती. पाण्याखाली जाणाऱ्या रस्त्यांची, दलदलीची आणि सांडपाणी निचर्याची दुरावस्था पाहिली होती. रस्त्यांसाठी जवळपास १.५ कोटींचा व सांडपाणी निचर्यासाठी १ कोट पर्यंत निधी देण्याबाबत आणि विकासकामे पूर्ण करण्याबाबत आश्वासित केले होते. पण हे काम झाले नाही. अशी अनेक कामे प्रभाग क्रमांक अठरामध्ये प्रलंबित आहेत.

तर दुसरीकडे शहरातील भागातील स्टेशन चौक ते सिव्हिल हॉस्पिटलचा रस्ता एकदम चकाचक आहे. तरी देखील या ठिकाणी कोट्यावधी रूपयांचा निधी खर्च केला जात आहे. या असमतोल विकासाला विरोध म्हणून माजी नगरसेवक अभिजीत भोसले, सामाजिक कार्यकर्ते रज्जाक नाईक यांच्यासह शामरावनगर अनेक नागरिकांनी स्टेशन रोडवरील रस्त्याचे काम थांबवले. विस्तारित भागातील विकासासाठी निधी देण्याचे मान्य केल्याशिवाय रस्त्याचे काम होऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली. तीन तास रस्त्याचे काम बंद पाडले. त्यानंतर मनपा नगर अभियंता परमेश्वर हलकूडे, महेश मदने व ऋतुराज यादव या ठिकाणी आले, त्यांनी आयुक्त शुभम गुप्ता यांना दूरध्वनी करून दिला. आयुक्तांनी लवकरच शामरावनगर परिसरात आवश्यक तो निधी दिला जाईल, असे आश्वासन दिल्यानंतर स्टेशन रोडवरील कामाला पुन्हा सुरूवात झाली.

सांगली : डांबरीकरणाचे काम माजी नगरसेवक अभिजित भोसले आणि सहकाऱ्यांनी धरण आंदोलन करुन काम बंद पाडले.

प्राथमिक शिक्षणमधील कनिष्ठ सहाय्यक निलंबित

सांगली : वरिष्ठांनी अनेकवेळा सुचना देऊनही कामात बदल न करणाऱ्या, नोटीसला समाधानकारक उत्तर न देणाऱ्या दिव्यांग लाभार्थींसह अनेक कामे प्रलंबित ठेवणाऱ्या जिल्हा परिषद शिक्षण विभागातील कनिष्ठ सहाय्यक मुकेश कोळी याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी ही कारवाई केली. प्राथमिक शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांनी ही माहीती दिली.

कामात अनियमितता, वरिष्ठांच्या सूचनांचे पालन न करणे, वारंवार गैरहजर राहणे, अशा विविध कारणास्तव जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील कनिष्ठ सहाय्यक मुकेश मुधकर कोळी यांना निलंबित करण्यात आले आहेत. तसे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी दिले आहेत. कोळी यांच्या काम काजाबाबत सातत्याने तक्रारी येत होत्या. त्यामुळे सीईओ धोडमिसे यांनी कोळी यांना निलंबित केले आहे.

अनधिकृत जाहिरात फलक लावणाऱ्यावर फौजदारी

आयुक्त शुभम गुप्ता

केसरी वृत्तसेवा

सांगली : महापालिका क्षेत्रातील अनाधिकृत, विनापरवानगी जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर पोस्टर्स, होर्डिंग्ज लावणाऱ्यांविरुध्द यापुढे सरळ फौजदारी दाखल करण्यात येणार आहे, तर छपाई करणाऱ्या व्यवसाय सिल करणार, तसेच दंडात्मक शुल्कही महापालिका वसुल करणार असल्याची माहिती महापालिकेचे आयुक्त शुभम गुप्ता यांनी दिली.

अनाधिकृत, विनापरवानगी जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर पोस्टर्स, होर्डिंग्ज छपाई करणाऱ्या व्यावसायिकावरही महापालिका दंडात्मक कारवाई करुन, व्यवसाय सीलबंद करणार आहे. दंडात्मक शुल्क न भरणाऱ्यांवर, त्यांच्या मिळकतीवर दंडाची रक्कम लागू होणार आहे.

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सांगली, मिरज, कुपवाड या शहरामध्ये नागरीक, तसेच राजकीय पक्ष, राजकीय तसेच इतर व्यक्तिंचे वाढदिवस, राजकीय व इतर मान्यवरांचे स्वागत, अभिनंदन, विविध सण, जयंती निमित्त शुभेच्छा देण्यासाठी व विविध प्रकारच्या व्यावसायकि जाहिरातीसाठी, बॅनर्स, पोस्टर्स, फलक, डिजीटल फ्लेक्स, कमानी इ. लावले जातात. परंतू यातील बरेच फलक, जाहिराती या विनापरवानगी, अनाधिकृत असलेचे दिसून येत आहे.

विनापरवाना जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर पोस्टर्स, होर्डिंग्ज इ. कामी उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका क्र. १५५/२०११ दाखल आहे. या याचिकेच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने यापूर्वीच दि. ३१.०१.२०१७ रोजी अनाधिकृत, विनापरवाना जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर पोस्टर्स, होर्डिंग्ज बाबतीत कारवाई करणेकरीता सक्त आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच उच्च न्यायालयातील दि. १९ डिसेंबर २०२४ रोजीच्या सुनावणी मधील आदेशान्वये, महाराष्ट्र शासनाने

महापालिकेतून

दि.७ जानेवारी २०२५ रोजी विना परवाना जाहिरात फलक, बोर्ड, बँनर पोस्टर्स, होर्डिंग्ज वर कारवाई करणेबाबत सक्त आदेश काढलेले आहेत.

त्यानुसार महापालिकेकडून अनाधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, पोस्टर्स, होर्डिंग्ज निष्काषीत करणे, कारवाईचे दरम्यान संबंधितांवर एफआयआर दाखल करणे, व दंडात्मक कारवाई ची मोहिम वेळोवेळी घेण्यात येत आहे.

शासनाच्या आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर पोस्टर्स, होर्डिंग्ज छपाई करणारे व्यवसायिक यांनी महानगरपालिकेची रितसर परवानगी असलेची खात्री करुनच जाहिरात फलकांची छपाई करण्यात यावी.

सदर छपाई केलेल्या फलकांवर व्यवसायधारक यांचे नांव, मोबाईल नंबर, जाहिरात फलकाची संख्या, व मनपाकडून देण्यात आलेल्या QR कोडची छपाई करणे व त्याच्या नोंदी ठेवणे बंधनकारक आहे. अन्यथा, कोणत्याही फलकावर वर नमुद बाबी छपाई केल्या नसतील आणि विना परवाना जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर पोस्टर्स, होर्डिंग्ज आढळून आल्यास संबंधित छपाई करणारे व्यावसायिक यांचेविरूध्द १०,००० रु इतके दंडात्मक शुल्क आकारणी करुन, त्यांचा व्यवसाय मनपाकडून सिलबंद करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त शुभम गुप्ता यांनी दिली.

शुल्क आकारणी कमी

जाहिरात फलक, बॅनर, पोस्टर्स, लावणेसाठी यापूर्वी ७ दिवस कालावधीसाठी प्रति स्के. फूट ५०रु या प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत होते. तसेच बिना परवाना, जाहिरात फलकावरील दंडात्मक शुल्क प्रति स्के. फुट १५०रु इतके शुल्क आकारण्यात येत होते. सदर परवानगीचे, दंडाचे शुल्क आता मनपाने कमी केलेले आहेत. आता यापुढे जाहिरात फलक, बॅनर, पोस्टर्स, लावण्यासाठी प्रति स्के. फुट २५रु आणि अनाधिकृत, विनापरवानगी जाहिरात फलक, बॅनर, पोस्टर्स वरील दंडात्मक शुल्क प्रति स्के. फुट ५०रु इतके निश्चित करण्यात आलेले आहे.

बुलेट रायडर अमोल माळी यांचे निधन

केसरी वृतसेवा

कोल्हापूर : बुलेट गाडीचे प्रसिद्ध मेकॅनिक आणि बुलेटप्रेमींमध्ये डॉक्टर म्हणून परिचित असलेले बुलेट रायडर अमोल रावसाहेब माळी (४७, मुळ,रा.बागल चौक, सध्या रा.अमेय वैभव रेसिडेन्सी, लिशा हॉटेल परिसर) यांचे शिरोडा, जि. सिधुदुर्ग येथे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. बागल चौक येथील अलंकार गॅरेज मध्ये बुलेटचे वस्ताद म्हणुन प्रसिद्ध असलेले वडिल रावसाहेब यांचा वारसा चालवताना,अमोल माळी यांनी बुलेट मेकॅनिक म्हणून स्वतःचे एक वलय निर्माण केले होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

माजी मुख्याध्यापक जयंत माळवदे यांचे अपघाती निधन

मिरज : मिरज येथील विद्यामंदिर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक तथा प्राचार्य जयंत माळवदे हे आपल्या पत्नी प्रभावती जयंत माळवदे (निवृत्त कर्मचारी) यांच्या बरोबर शुक्रवार दि. १४ रोजी सायंकाळी दुचाकीवरून नृसिंहवाडीला जात असताना कुत्रा आडवा आल्याने त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात त्यांचा वाहनावरचा ताबा सुटला व ते दोघेही दुचाकीवरून रस्त्यावर पडले. त्यांच्या पत्नीला किरकोळ दुखापत झाली. मात्र त्यांच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली व रक्तस्त्राव झाला. दोघांनाही तातडीने समर्थ हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. मात्र सोमवारी सकाळी जयंत माळवदे यांचे उपचार सुरु असताना निधन झाले. माळवदे सर यांनी निवृत्तीनंतर विशेष करून कल्पतरू कॉलनीसाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले होते. सार्वजनिक हनुमान मंदिरामध्ये सुरुवातीपासून कार्यरत होते. त्यांच्या निधनाने परिसरात व त्यांच्या विद्यार्थी वर्गात शोकककळा पसरली आहे.

निधन वार्ता

उत्तम कदम

वारणानगर : गिरोली (ता. पन्हाळा) येथील उत्तम रामचंद्र कदम (वय ६८) यांचे निधन झाले. गिरोलीचे पोलीस पाटील मोहन कदम यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन बुधवार दि. १९ रोजी सकाळी ९ वाजता गिरोली येथे आहे.

कल्लाप्पा शिरघट्टी

उमदी : येथील कल्लाप्पा शिरघट्टी यांचे निधन झाले. सर्वोदय शिक्षण संस्था संचालक होत. ते लकप्पा शिरगट्टी यांचे वडील व विद्या शिरगट्टी यांचे सासरे होते, त्यांच्या पश्चात मुलगा, सुन, नातवंडे, असा परिवार आहे.

सुलभा केळकर

कोल्हापूर : राजारामपुरी आठवी गल्ली येथील सुलभा प्रभाकर केळकर (वय ८४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. याआधी सांगलीतील गावभाग येथे अनेक वर्षे त्या राहत होत्या. त्यांच्या पश्चात मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

हाजी दिलशाद राऊत

कुरुंदवाड : येथील हाजी दिलशाद शमशुद्दीन राऊत (वय ६४) यांचे सौदी अरेबियाच्या मदिना नगरीत निधन झाले. त्या कोल्हापूरचे नामांकित बांधकाम व्यावसायिक आणि आर्किटेक्ट कै. अमीर इलाही लुकमान फरास यांच्या बहीण होत. तसेच ते मोहसीन शमशुद्दीन राऊत यांच्या मातोश्री आणि सामाजिक कार्यकर्ते बाबा फरास यांच्या आत्ती होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे अंत्यसंस्कार सौदी अरेबियामध्ये पार पाडण्यात आले.

ताराबाई लाड

कुंडल : येथील श्रीमती ताराबाई दत्तात्रय लाड (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. रक्षाविसर्जन बुधवार दि. १९ रोजी सकाळी १० वाजता कुंडल येथे आहे.

बस्तवडे शाळेतील 'शिक्षकांच्या दांडी' प्रकरणी योग्य कारवाई करू

तृप्ती धोडमिसे

केसरी वृत्तसेवा

तासगाव : तालुक्यातील बस्तवडे येथील जिल्हा परिषद शाळेतील तीनही शिक्षकांनी शनिवारी रजा न घेता शाळेला दांडी मारली. त्यामुळे चक्क शिक्षकाविना शाळा भरली. या प्रकरणाची शिक्षण विभागाने गंभीर दखल घेतली आहे. याप्रकरणी मुख्याध्यापकांसह शिक्षकांवर योग्य ती कारवाई करू, असे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी सांगितले.

बस्तवडे येथे जिल्हा परिषदेची शाळा आहे. पहिली ते चौथीच्या वर्गात सुमारे ६५ विद्यार्थी शिक्षण घेतात. या शाळेवर मुख्याध्यापक व इतर दोन शिक्षक अशी नेमणूक आहे. मुख्याध्यापक म्हणून विद्या मिरजकर या काम पाहत आहेत. तर दिपाली भोसले व दीपक माळी हे दोन शिक्षक या शाळेत ज्ञानार्जनाचे काम करतात.

शनिवारी सकाळच्या सत्रात शाळा होती. दर शनिवारी सकाळी ७ वाजून मात्र दोन दिवसांपूर्वी शनिवारी मुख्याध्यापक विद्या मिरजकर यांच्या मुलीचा कोल्हापूर येथे साखरपुडा होता. त्यामुळे त्यांनी रजा न घेताच शाळेला दांडी मारली. गुरुवार, शुक्रवार व शनिवार या तीनही दिवशी मिरजकर यांची रजा नसल्याचे दिसून आले. तर दिपाली भोसले याही शनिवारी कोल्हापूर येथे साखरपुड्याच्या कार्यक्रमाला गेल्या होत्या. दीपक माळी हे शिक्षकही घरातून कोल्हापूरला जाण्याच्या तयारीत होते.

दरम्यान, शनिवारी सकाळी एकही शिक्षक शाळेत न आल्याने शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल पाटील यांनी तातडीने शाळेत धाव घेतली. अन्य पालकही शाळेत आले. यावेळी विद्यार्थी व्हरांड्यात बसल्याचे दिसून आले. शिक्षकांबाबत चौकशी केली असता विद्या मिरजकर व दिपाली भोसले या दोघीही साखरपुड्याच्या कार्यक्रमाला कोल्हापूरला गेल्याचे समजले. विशेष म्हणजे या तिघांनीही कोणत्याही प्रकारची अधिकृत रजा मंजूर करून घेतली नव्हती.

हा प्रकार समजतात गटशिक्षण अधिकारी आबासाहेब लावंड यांनी शाळेत धाव घेतली. यावेळी शाळेचा कारभार रामभरोसे सुरू असल्याचे दिसून आले. मिरजकर यांनी सलग तीन दिवस रजा न घेता शाळेला दांडी मारल्याचे समोर आले. तर दिपाली भोसले व दीपक माळी यांचीही रजा न घेता शनिवारी शाळेला दांडी मारल्याचे निदर्शनास आले.

मुंबई मंत्रालयात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देताना संग्रामसिंह देशमुख. सोबत माजी मंत्री अब्दुल सत्तार.

कडेगाव तालुक्यातील ४०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार : संग्राम देशमुख

केसरी वृत्तसेवा

सांगली : पलूस-कडेगाव विधानसभा मतदारसंघातील कडेगाव तालुक्याच्या उत्तरेला असलेल्या ढाणेवाडी, खेराडे वांगी, उपाळे मायणी, उपाळे वांगी आणि तोंडोली या गावांतील ४०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्यासाठी टेंभू प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक २ अंतर्गत हिंगणगाव बुद्रुक तलावातून स्वतंत्र उपसा सिंचन योजना राबवून हे क्षेत्र ओलिताखाली येण्याबाबत सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक संग्रामसिंह देशमुख (भाऊ) यांनी काल मुंबई मंत्रालयात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली.

यावेळी संग्रामसिंह देशमुख यांनी सदर ४०० हेक्टर क्षेत्र हे टेंभू व ताकारी योजनेच्या पाण्यापासून वंचीत असलेले क्षेत्र आहे.त्यामुळे पाण्याविना येथील ४००हेक्टर क्षेत्र ओलिताखाली नाही.त्यामुळे येथील शेतकरी पाण्यापासून कित्येक वर्षे वंचीत राहिले आहेत. तरी सदर ४०० हेक्टर क्षेत्रास पाणीमिळाल्यास तेथील शेकडो सर्वसामान्य शेतकऱ्यांचे संसार सावरले जातील याबाबत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावेळी मंत्री महोदय यांनी सदर ४००हेक्टर क्षेत्र ओलिताखालील येण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या ४०० हेक्टर क्षेत्राबाबत माहिती देवून सदर प्रस्ताव मंत्रीमंडळात सादर करुन मंजुरी मिळविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करुन हे काम मार्गी लावू असे आश्वासन राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

महाराष्ट्र शासन

उपवनसंरक्षक, सांगली वन विभाग, सांगली यांचे कार्यालय

पत्ता- फॉरेस्ट कॉलनी, हनुमान नगर एम. आय. डी. सी. रोड, कुपवाड, सांगली - ४१६४३६

जाहीर संक्षिप्त ई-निविदा सूचना क्र. ६/२०२४-२५

उप वनसंरक्षक, (प्रा) सांगली वनविभाग सांगली, या विभागाकडील विविध योजनांतर्गत एकूण ११ कामांची ई निविदा क्र. ०६ सन २०२४-२५ महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दोन लिफाफे पध्दतीने मागवीत आहे. ई निविदा https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सर्व कामे दि. १४.०२.२०२५ ते दि. २४.०२.२०२५ रोजी दु. २ वाजेपर्यंत प्रसिध्द करण्यात येत आहेत. ई निविदा दि. २५.०२.२०२५ रोजी (शक्य झाल्यास) उघडणेत येणार आहेत.

सही/- (नीता कट्टे)
उप वनसंरक्षक,
सांगली वन विभाग सांगली

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: सांगली

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 16.08.2022 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. रोहित किशोर कुलकर्णी 2. रसिका रोहित कुलकर्णी 3. अनुराधा किशोर कुलकर्णी 4. गौरी कुलकर्णी (मयत सहकर्जदार राहुल किशोर कुलकर्णी यांच्या कायदेशीर वारसदार) मृण्मयी कुलकर्णी (मयत सहकर्जदार राहुल किशोर कुलकर्णी यांच्या पालक गौरी कुलकर्णी यांच्या मार्फत कायदेशीर वारसदार)	अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : मालमत्तेचे अधिमापन सी एक क्र. 12178, प्लॉट क्र. 2, अधिमापन 544.5 चौ.मी., जीवन अपार्टमेंट फ्लॅट क्र. 12, अधिमापन 36.65 चौ.मी. चटई क्षेत्रफळ आणि 46.08 चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ आणि फ्लॅट क्र. 9 अधिमापन 46.09 चौ.मी. बांधकाम आणि 36.66 चौ.मी. चटई क्षेत्रफळ, 2रा मजला, वसावडे हॉस्पिटल आणि डीमार्ट मॉल जवळ, मंगलमूर्ती कॉलनी, साऊथ शिवाजी नगर, मु.पो. जि. - सांगली 416416. उपनिबंधक सांगलीच्या हद्दीमध्ये आणि सांगली मिरज कुपवाड नगर परिषदेच्या हद्दीमध्ये आणि पुढीलप्रमाणे सीमाबद्ध : सीमाबद्ध फ्लॅट क्र. 12: पूर्व - मोकळी जमीन आणि शासकीय रस्ता; पश्चिम - फ्लॅट क्र. 11; उत्तर - मोकळी जमीन; दक्षिण - फ्लॅट क्र. 9 सीमाबद्ध फ्लॅट क्र. 09: पूर्व - मोकळी जमीन; पश्चिम - पॅसेज, जिना आणि फ्लॅट क्र. 10; उत्तर - फ्लॅट क्र. 12; दक्षिण - मोकळी जमीन	KOHHL18000219	07 फेब्रुवारी 2025	रु. 2,53,822.80	रु. 30,41,668.13/-	रु. 25,38,228	पूर्वनियोजित भेटीसह सर्व कामकाजाच्या दिवशी	25.03.2024 रोजी दुपारी 12.30 ते 2.00

सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **24/03/2025** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी एलटीएफ द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **25/03/2025** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **25/03/2025** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : शेखर काळे, एल & टी फायनान्स लि., ऑफिस क्र. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005 आणि संतोष तिवारी, एल & टी फायनान्स लि., वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098, महाराष्ट्र, भारत, संपर्क क्र. 022-68076666.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्गेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्गेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 18.02.2025
ठिकाण: सांगली

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड